**महाराष्ट्र शासन**

समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग
शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१९८२/५८५५३/(८९२)/का-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.

**दिनांक २९ जानेवारी १९८३.**

**पहा** - शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक सीबीसी-१४६७-म, दिनांक १३ ऑक्टोबर १९६७.

**शासन निर्णय.**- शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक सीबीसी-१४६७-म, दिनांक १३ ऑक्टोबर १९६७ अनुसार शासनाने महाराष्ट्राच्या सर्व भागांकरिता एकत्रित अशी जातवार इतर मागासलेल्या वर्गांची यादी प्रसिध्द केली आहे. नंतरच्या काळात त्यात वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेली असून सध्याची स्वयंपूर्ण यादी सोबत जोडलेल्या यादीनुसार आहे. ही यादी जातवार असल्यामुळे, त्याचा फायदा केवळ हिंदु व शीख धर्मातील लोकांनाच दिला जात आहे. उपरोक्त धर्मांच्या बंधनाबाबत शासनाने भारतीय घटनेतील तरतुदींच्या संदर्भात फेरविचार करुन आता असा निर्णय घेतला आहे की, इतर मागासवर्गीयांच्या यादी संदर्भात कोणतेही धार्मिक बंधन लावण्यात येऊ नये आणि या यादीचा फायदा सर्व धर्मियांना देण्यात यावा. या निर्णयानुसार यादीतील अनुक्रमांक १९५ वरील "तांबोळी" या नोंदीपुढील "मुस्लीम धर्मीय" हा शब्द वगळण्यात आला आहे.

शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, क्रमांक सीबीसी-१०७७/५०८७६/कार्यासन-५, दिनांक २१ मार्च १९७९ च्या सोबत जोडलेल्या सूचनांमधील सूचना क्रमांक २१ मधील खालील भाग रद्द करण्यात आला आहे :-

"The list of Other Backward Classes is on caste basis. Persons professing religion other than Hindu and Sikh cannot, therefore, be considered as belonging to Other Backward Classes. However, following communities professing Muslim religion are included in the list of Other Backward Classes :- (i) Julaha, (ii) Laddaf, (iii) Pinjara, (iv) Momin, (v) Fakir Bandarwala and (vi) Tamboli."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सही) मु. प. दामले
सहाय्यक सचिव.